सं.फौ.ख.क्र.११८५/२०२१
सरकार वि.  मोहम्मद शाहीद
निशाणी क्र. ०६

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – आशिष रुपचंद कुंभरे

वय – २६ वर्ष, व्यवसाय – चालक

राहणार – घोरपड, कामठी, जिल्हा – नागपूर.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे**

**१.** दिनांक ३०.०९.२०२० रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता बोलविले नव्हते. पोलीसांनी माझे समक्ष कोणतीही पंचनाम्याची कारवाई केली नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. मी अपघातस्थळी अपघात बघायला गेलो होतो त्यावेळी पोलीसांनी माझी सही घेतली. त्यातील मजकुर मला माहित नाही. सहीला **नि.क्र.७** देण्यात येते.

**(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली– परवानगी देण्यात आली.)**

**२.** हे म्हणणे खरे नाही की दिनांक ३०–०९–२०२० रोजी पोलीसांनी मला कामठी कळमना रोड वर कॅनलच्या बाजूला पंचनाम्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी सांगितल्याप्रमाणे मी घटनास्थळी गेलो. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्यसाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री पंकज यादव वकील यांच्या तर्फे**

**नाकारला**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2023.10.13 12:23:52 +0530

**(रा.र. शेरेकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.

ठिकाण –कामठी
दिनांक –१३/१०/२०२३